महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
ठाकरसी हाऊस, मुंबई पोर्ट ट्रस्ट, ३ रा मजला,
शुरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६२२०२९ संकेतस्थळ- www.mahakosh.in
२२६२६२९१/२२६२२०३६ E Mail ID aoexamdat.mum-mh@gov.in

पहा : १) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. संलेको/परीक्षा-१७/६ वी म.ले.स्था.नि.ले.वि.परीक्षा/२०१७/२६०
दिनांक :- ०५/०७/२०१७

क्रमांक : संलेको/परीक्षा-१७/६ वी म.ले.स्था.नि.ले.वि.परीक्षा/डिसेंबर-२०१७/वेळापत्रक/११-२०१७/३९८

दि. 22 NOV 2017

-:परिपत्रक:-

माहे डिसेंबर-२०१७ मध्ये घेण्यात येणा-या ६ वी म.ले.व स्था.नि.ले गट-क सेवा विभागीय परीक्षा भाग-१ व भाग-२ या परीक्षेचे वेळापत्रक खालील प्रमाणे निश्चित करण्यांत येत आहे. तसेच विभागवार परीक्षेचे केंद्र खालील प्रमाणे आहे.

१) अमरावती विभाग:- सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालय, लेखाकोष भवन, विद्यापीठ रोड, अमरावती विभाग, अमरावती.

२) औरंगाबाद विभाग:- प्राचार्य, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

३) कोकण विभाग :- भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, नवी मुंबई सेक्टर-८, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.

४) नागपूर विभाग :- शासकीय विज्ञान संस्था, नागपूर विद्यापिठच्या बाजूला, महाराजबाग रोड, नागपूर

५) नाशिक विभाग :- मुख्याध्यापक, शासकीय कन्या विद्यालय, जुन्या सि. बि. एस. जवळ, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जिल्हा परिषद स्टेडीयम, नाशिक.

६) पुणे विभाग :- एस. एम. चोकसे हायस्कुल आणि ज्युनीअर कॉलेज, १९८३, कॉन्व्हेंट स्ट्रीट, पुणे.-४११००१.

परीक्षेचा दिनांक व वार	परीक्षेची वेळ	पेपर क्रमांक	विषय	गुण
		भाग-१		
२६/१२/२०१७ मंगळवार	१०.०० ते १.००	पेपर क्र. १	सामान्य विषय कार्यालय रचना, कार्यालयीन कार्यपध्दती, मसुदा लेखन व टिप्पणी (पुस्तकांशिवाय)	१००
	२.०० ते ५.००	पेपर क्र. २	सामान्य विषय सर्वसाधारण प्रयुक्ती नियम व नियमपुस्तिकां (पुस्तकांशिवाय)	१००
२७/१२/२०१७ बुधवार	१०.०० ते १.००	पे.क्र.३ (क)	विशेष विषय (पुस्तकासह) (लेखा व कोषागारे संचालनालय आणि त्यांचे अधिनस्त दुय्यम कार्यालये यांच्यासाठी)	१००
		पे.क्र.३ (ख)	विशेष विषय (पुस्तकासह) (अधिदान व लेखा कार्यालय) मुंबई कार्यालयासाठी -)	१००
		पे.क्र.३ (ग)	विशेष विषय (पुस्तकासह) (मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालय, मुंबई आणि त्यांच्या अधिनस्त दुय्यम कार्यालये यांच्यासाठी)	१००
		पे.क्र.३ (घ)	विशेष विषय (पुस्तकासह) (जिल्हा कोषागारे व उपकोषागारे कार्यालयासाठी)	१००
		भाग-२		
२८/१२/२०१७ गुरुवार	१०.०० ते १.००	पे.क्र. १	सेवा नियम (पुस्तकांशिवाय)	१००
	२.०० ते ५.००	पे.क्र. २	लेखा नियम व कोषागार नियम (पुस्तकांशिवाय)	१००
२९/१२/२०१७ शुक्रवार	१०.०० ते १.००	पे.क्र. ३	वित्तीय नियम (पुस्तकांशिवाय)	१००
	२.०० ते ५.००	पे.क्र. ४	संक्षेपण व मसुदा लेखन (पुस्तकांशिवाय)	१००
३०/१२/२०१७ शनिवार	१०.०० ते १.००	पे.क्र.५ (क)	विशेष विषय प्रात्यक्षिक (कोषागारे) (पुस्तकांसह)	१००
		पे.क्र.५ (ख)	विशेष विषय[स्थानिक निधी लेखा कार्यालयासाठी] (पुस्तकांसह)	१००
		पे.क्र.५ (ग)	विशेष विषय [अधिदान व लेखा कार्यालयासाठी] (पुस्तकांसह)	१००
		पे.क्र.५ (घ)	विशेष विषय [संचालनालय व प्रादेशिक कार्यालये] (पुस्तकांसह)	१००
		पे.क्र.५ (ङ)	विशेष विषय [जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालयातील कर्मचा-यांकरीता] (पुस्तकांसह)	१००

		पे.क्र.५ (च)	विशेष विषय [वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील कर्मचा-यांकरीता] (पुस्तकांसह)	१००

सूचना : भाग-१ मधील पे.क्र. ३ व भाग-२ मधील पेपर क्रमांक ५ हा फक्त त्यांच्या समोर दर्शविलेल्या कार्यालयातील कर्मचा-यांकरीता आहे.

परीक्षेला येतांना फोटो असलेले व कार्यालय प्रमुखाने साक्षांकित केलेले ओळखपत्र घेवून यावे तसेच उमेदवाराने स्वताचे शासकीय ओळखपत्र घेऊन यावे, अन्यथा परीक्षेला प्रवेश नाकारण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

याबाबत असेही सूचित करण्यात येते की सर्व विभागीय सहसंचालकांनी त्यांचे विभागासाठी केंद्र प्रमुखांचे नेमणूक आदेश निर्गमित करावेत व त्या आदेशाची प्रत या संचालनालयास पाठवावी.

Desai 21/11/17

(विकास देसाई)
सहसंचालक (प्रशासन)
लेखा व कोषागारे, मुंबई

१.प्रत सस्नेह रवाना :- संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई

प्रत:

1. विभागीय सहसंचालक लेखा व कोषागारे (सर्व) यांनी त्यांचे विभागाचे अधिपत्याखालील परीक्षेस बसलेल्या इतर शासकीय कर्मचा-यांना कळवावे.
2. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
3. अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१
4. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा (सर्व) (आपल्या विभागातील सर्व उपमुख्यलेखापरीक्षक यांना कळवावे)
5. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व) (आपल्या जिल्हयातील सर्व उपकोषागार कार्यालयांना कळवावे)

ओ ळ ख प त्र

Photo

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री. /श्रीमती / कुमारी ----------
हे /हया ----------
कार्यालयात ---------- म्हणून काम करीत असून त्यांना --------- महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा सेवा गट क विभागीय परीक्षा भाग-१ व २ परीक्षेस, लेखा व कोषागारे संचालनालयाकडून परवानगी मिळालेली आहे. कर्मचा-यांने खाली* माझ्या समक्ष सही केली आहे.

कार्यालयीन अधिका-याची दिनांकित सही व शिक्का

<u>उमेदवारांसाठी सूचना</u>

उमेदवाराने खाली दर्शविलेल्या गोष्टी केल्याचे आढळून आले तर जसे

१. उमेदवाराने परीक्षागृहात पुस्तक, नोंदवही, कच्चे कागद इत्यादी आणल्यास तसेच कार्यालयीन प्रकाशने परवानगी दिल्याचे खेरीज आणली असल्यास
२. परीक्षा चालू असतांना उमेदवाराने दुस-या उमेदवाराशी बोलण्याचा अथवा चर्चा करण्याचा प्रयत्न तथा चर्चा केल्यास
३. उमेदवाराने परीक्षागृह सोडतांना कोरी अथवा लिहिलेली उत्तरपत्रिका नेण्याचा प्रयत्न केल्यास, व
४. निरीक्षक व पर्यवेक्षक यानी दिलेल्या सूचनांची अवज्ञा केल्यास अथवा त्यांच्याशी उध्दटपणाचे वर्तन केल्यास

तर उमेदवाराची परवानगी रद्द करण्यात येईल व त्याच्यावर पुढील योग्य कारवाई करण्यासाठी त्याचे नांव सक्षम अधिका-यांना कळविण्यात येईल याची त्यांनी कृपया नोंद घ्यावी.

जर एखाद्याउमेदवाराला परीक्षागृहातून बाहेर पाठविण्यात आले तर, त्याने परीक्षागृह सोडण्यापूर्वी पर्यवेक्षकामार्फत लेखी निवेदन या कार्यालयास सादर केले पाहिजे.

वरील सर्व सूचनांची नोंद घेतली आहे.

*परीक्षार्थीची सही :-

माझ्या समक्ष सही केली

दिनांक :

कार्यालयीन अधिका-याची दिनांकित सही व शिक्का

टीप :- उत्तरपत्रिका उमेदवारांना पुरविण्यात येतील. लिहिण्याचे साहित्य शाई, पेन वगैरे व पुस्तके मात्र उमेदवारांनी स्वत:च आणावयाची आहेत. पुस्तके पर्यवेक्षकांना अर्धा तास आधी दाखवून मगच उपयोगात आणावीत पुस्तकात कोठेही हस्तलिखित दुरुस्त्या व मजकुर असू नये.